# कास्ट्राईब शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य बैठकीचे इतिवृत्त दि. १५/११/२०१८

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | मागासवर्गीयांचा भरतीमधील अनुशेष दूर करणे दि. २ मे २०१२ नंतर नियुक्ती दिलेल्या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील शिक्षण सेवकांना मान्यता देणे. (विहीत मुदतीत) संदर्भ शासन निर्णय शालेय व क्रीडा विभाग दि. ४ एप्रिल २०१८ व दि. २४ ऑगस्ट २०१८. | सिंधुदुर्ग - शा.नि. दि.४ एप्रिल २०१८ व दि. २४ ऑगस्ट २०१८ नुसार संस्थांकडून नव्याने प्रस्ताव मागविण्यात आले. प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. दि.३१/१२/२०१८ पर्यंत कार्यवाही पूर्ण ~~होईल~~. करावी<br>कोल्हापूर - उपरोक्त शासन निर्णयानुसार शिक्षक मान्यतेची कार्यवाही सुरु आहे. ज्या प्रस्तावांमध्ये त्रुटी आहेत अशा प्रकरणांमध्ये त्रुटींची पुर्तता करुन घेवून मान्यता देण्यात येतील.<br>रत्नागिरी - उपरोक्त शासन निर्णयान्वये प्रस्ताव मागवून कार्यवाही मान्यतेची कार्यवाही पूर्ण केली आहे.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी मान्यतेसंदर्भात त्रुटी अभावी मान्यता प्रलंबित असल्यास संबंधीतांकडून त्रुटींची पुर्तता करुन घेवून मान्यता देण्याची कार्यवाही पूर्ण करावी.<br>अनियमित मान्यात संदर्भात तक्रारी असल्यास संघटनेने शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या निदर्शनास आणाव्यात, कार्यालयाकडून चौकशी करण्यात येईल. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| २. | पदोन्नतीमधील अनुशेष पूर्ण करावा. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक पदोन्नती या छोटया संवर्गातील अनुशेष भरावा. संदर्भ शासन निर्णय शालेय व क्रीडा विभाग दि. २६ सप्टेंबर २०१७. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय दि. २६ सप्टेंबर २०१७ नुसार कार्यवाही करावी.<br>विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तक्रारीबाबत संघटनेने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.सिंधुदुर्ग यांचेकडे निवेदन द्यावे. शिक्षणाधिकारी यांनी निवेदनावर कार्यवाही करुन तक्रारींचे निराकरण करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ३. | मागासवर्गीयांचा रोस्टर डावलून दिलेल्या शिक्षण सेवक मान्यता रद्द कराव्यात. मा. आयुक्त शिक्षण यांच्या पत्रानुसार. | या प्रकरणी झालेली अनियमितता तपासून शिक्षणाधिकारी यांनी तसा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४. | मागील वर्षी समायोजन न झालेल्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन तात्काळ व्हावे. ज्या शाळांनी अतिरिक्त शिक्षकाचे समायोजन केले नाही त्यांचे पद व्यपगत करण्याची कारवाई करावी. संदर्भ शासन | ज्या शाळांनी अतिरिक्त शिक्षकाचे समायोजन केले नाहीत अशा शाळांची पदे व्यपगत करण्याची कारवाई झालेली आहे. सद्यस्थितीत एकूण २२ पदे व्यपगत करण्याची शिफारस संचालनालयाकडे करण्यात आलेली आहेत. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग दि. ४ ऑक्टोबर २०१७. | तसेच सन २०१८-१९ चे समायोजनाबाबत शासन स्तरावरुन परिपत्रक निर्गमित करण्यात येणार असून जिल्हास्तरावर दि.२७/११/२०१८ पर्यंत व दि.३०/११/२०१८ पर्यंत विभागस्तरावर ऑफलाईन पध्दीतीने समुपदेशनाने समायोजन करण्याबाबत मा.आयुक्त यांनी सूचना दिलेल्या आहेत. जिल्हास्तरावर समायोजन न झालेल्या शिक्षकांचे विभाग स्तरावर समायोजन करण्यात येणार आहे. | | |
| ५. | सेवाज्येष्ठताबाबत शासन निर्णय शालेय व क्रीडा विभाग दि. १४ नोव्हेंबर २०१७ प्रमाणे कार्यवाही होणेबाबत. | शिक्षणाधिकारी यांनी सेवाज्येष्ठताबाबत शासन परिपत्रक दि. १४ नोव्हेंबर २०१७ च्या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ६. | मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयानुसार श्रीम. नांदलस्कर चंद्रकला मनोहर, सहा-शिक्षिका, कोर्ले – धालवली माध्यमिक विद्यालय, कोर्ले धलवली, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग यांचे समायोजन तात्काळ करणे. आपले संदर्भीय पत्र जा.क्र.माध्य /२/ पदाबाबत /कोवि/३६००-१/२०१६ दि. १५ फेब्रुवारी २०१६. तसेच मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे यांचे संदर्भीय पत्र क्रमांक अमाशा ३४१८/१४३११/माध्य अ (२८१/५०७४ दि. २५ जुलै २०१८. | मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयानुसार श्रीम. नांदलस्कर चंद्रकला मनोहर, सहा-शिक्षिका, कोर्ले – धालवली माध्यमिक विद्यालय, कोर्ले धलवली, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग यांचे समायोजन शाळा करुन घेत नसल्यास संबंधीत शाळेचे पद व्यपगत करण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ संचालनालयास सादर करावा. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. सिंधुदुर्ग स्तरावर | तात्काळ |
| | ➢ **आयत्या वेळचे विषय** | | | |
| १ | दि. ३ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकनुसार बैठकांचे आयोजन करावे. | शिक्षण उपसंचालक/शिक्षणाधिकारी यांनी बैठकांच्या आयोजनाबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ३ मार्च २०१८ च्या शासन परिपत्रकनुसार कार्यवाही करावी. | शि.उ. / शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

**शिक्षण उपसंचालक**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**